माधुरी नाईक

# सज्जनगड सातारा



# किल्ले सज्जनगड सातारा

माधुरी अरविंद नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव किल्ले सज्जनगड
प्रकार : दुर्ग दर्शन

लेखिका : माधुरी अरविंद नाईक,

ई-मेल : madhuri.jadhav26@yahoo.in

आतील फ़ोटो: माधुरी नाईक, अरविंद नाईक

मुखपृष्ठ फ़ोटो : itravel-iclick. blogspot

या पुस्तकातील लेखनाचे व फ़ोटोंचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन: ई साहित्य प्रतिष्ठान, १९ मार्च २०१५

www.esahity.com

esahity@gmail.com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2015

ई साहित्य प्रतिष्ठान

अलाद्दीनची गोष्ट माहित असेल ना? अलाद्दीन आणि जादूचा दिवा. हा जादूचा दिवा मिळाल्यावर अलाद्दीन काहिही करू शकतो. काहिही मिळवू शकतो. हवं तेवढं मोठं घर बांधतो. सुलतानाच्या मुलीला मिळवतो. त्याचं हे गुपित कळल्यावर एक दिवस त्याचा दुष्ट काका मुस्तफ़ा एका “व्यापाऱ्याच्या” वेषात येतो. घरात अलाद्दीनची बायको म्हणजे सुलतानाची लाडावलेली मंद मुलगी असते. दुष्ट मुस्तफ़ा तिला चकचकीत छान छान दिवे दाखवतो आणि घरातल्या जुन्या दिव्याच्या बदल्यात ते देऊ करतो. तिला नाहीतरी आपला जुनाट दिवा आवडत नसतोच. ती लगेच तयार होते.

पुढची गोष्ट आजही सुरूच आहे.

आम्ही परदेशी व्यापाऱ्यांच्या जाहिरातींना भुलून आपली भाषा, आपले किल्ले, आपले विचार सगळेच मातीमोल समजायला लागलो आहोत. आपल्याला सगळ्या विदेशी वस्तूंचं आणि स्थळांचं कौतुक. विदेशी लोकांच्या आचार विचारांचं कौतुक. अगदी आपल्याला आपली भाकरी झुणका सुद्धा फ़ालतू वाटायला लागलेत. बर्गर आणि पिझ्झाच्या समोर पुरणपोळी सुद्धा बेचव वाटते. आपल्या लेण्यांचं, किल्ल्यांचं, भाषेचं जतन करण्यात जर आपण मागे पडलो तर आपलं काही खरं नाही ब्वा.

दक्षिण भारत हा भव्य मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. एका एका मंदिराची उंची, भव्यता आणि श्रीमंती पहात आणि ऐकत रहावी. म्हणून तर पर्यटक दक्षिणेची मंदिरं पहायला जातात. दक्षिणात्य लोकांना या मंदिरांचा फ़ार अभिमान आहे. काहीसा गर्वही. असायलाच हवा. पण ती मंदिरं उत्तरेतहून आलेल्या आक्रमक वावटळीपासून सुरक्षित राहिली याचं श्रेय मात्र मराठी लोकांनी अभिमानाने घ्यायला हवं. मुघलशाही, कुतुबशाही , आदिलशाही अशा बड्या बड्या शाह्यांशी एक हाती मुकाबला करून आम्ही मराठ्यांनी तंजावर ते पेशावर मराठेशाही स्थापन केली. आमच्या या किल्ल्यांनी आमच्या पूर्वजांनी एक संरक्षक भिंत उभी केली म्हणून दक्षिण सुरक्षित राहिली. सर्वच मराठी जण लढाईला गेले असतील असे नाही. पण काहींनी रसद पोचवली असेल. आणि काहींनी घाम गाळून दणकट किल्ले बांधले असतील. थोडे थोडके नाही

तिनशेहून अधिक कडक किल्ले. राजस्थानसारखे शोभेचे किल्ले नाही. मराठ्यांचे किल्ले म्हणजे रणकंदनी किल्ले. आमनेसामनेच्या युद्धात जिंकणं अशक्य असे किल्ले. प्रत्येक किल्ल्याची गुंतागुंतीची रचना. प्रत्येक किल्ल्याची वेगवेगळी शक्तीस्थानं. प्रत्येक किल्ला एक ऊर्जास्थान. एक शक्तीस्थळ. त्यामुळे मराठ्यांच्या मुलींनी जोहार बिहार केले नाहीत. त्याही घोड्यांवर बसून रणात उतरल्या. शत्रूंना कापले. असं हे शक्तीस्थळ. मुडद्यासारख्या मनालाही उभारी देईल असं. या किल्ल्यांचा आम्हाला गर्व आहे. हे किल्ले हे आमच्या तरुणांसाठी मंदिरंच आहेत. आई भवानीची शक्ती मंदिरं. यांच्यातून मिळणारी ऊर्जा हाच आमचा अलाद्दीनचा चिराग. या जगातलं काहिही मिळवण्याची उमेद जागवणारा दिवा. पथदर्शक दिवा. जादुई.

ई साहित्य प्रतिष्ठानने या प्रत्येक शक्तीस्थळाचं स्वतंत्र ई पुस्तक बनवण्याचं काम हाती घेतलं. म्हणता म्हणता हजार हात पुढे सरसावले. नचिकेत जोशीपासून सुरू झालेल्या या योजनेत माधुरी नाईक, अरविंद नाईक, पंकज घारे, ओंकार ओक अशा तरूण लेखकांच्या फ़ळीत आता भास्कर नारकर, संकल्प चौधरी असे ताज्या दमाचे शिलेदार सामिल होत आहेत. या पुस्तिकांतून नव्या ट्रेकर्सना मार्गदर्शन तर होतेच पण विदेशात असलेल्या किंवा वयानुरूप ट्रेकिंगपासून दूर असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. त्यामुळे या पुस्तिका फ़ार आनंदाने वाचल्या जातात.

या पुस्तिका प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचल्याच पाहिजेत. आम्ही त्यासाठी लाखों लोकांना या मेलने विनामूल्य पाठवतो. पण कोट्यवधी मराठी लोकांपर्यंत त्या न्यायच्या तर त्यासाठीही हजार हात हवेत. तुमच्या ओळखीच्या तरूण मंडळींना या अभियानात सामिल करून घ्या. त्यांचे ई मेल पत्ते कळवा. त्यांना पुस्तके द्या. आता ही पुस्तके मोबाईलवरही वाचता येतात. www.esahity.com वरून डाऊन लोड करा. शिवाय नवनवीन apps येत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचं app लवकरच येत आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही. ती एक वृत्ती आहे. एक परंपरा. एक वारसा. त्याचं जतन करूया. सर्व राजकारणापासून दूर राहून. पुढच्या पिढ्यांना या समृद्ध वारशाचा लाभ घेऊ द्या. त्यासाठी पैसे नकोत. फ़ार वेळही नका देऊ. कृपया आपल्या ओळखीच्या दहा मंडळींचे ई मेल पत्ते कळवा. आमचे VIP सभासद होण्यासाठी एवढंच पुरेसं आहे.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

हे पुस्तक समर्थ

श्री रामदासांच्या

विचारांप्रमाणे आचरण करणाऱ्या

भक्तांना

आदरपुर्वक अर्पण

--माधुरी नाईक

# किल्ले सज्जनगड

सातारा जिल्ह्यामध्ये अनेक प्रेक्षणिय स्थळे आहेत. या ठिकाणाचं स्वतःचं वेगळं असं वैशिष्ट्य़ आहे. साताऱ्याला जाण्यासाठी खास निमित्त होतं ते चिऊ आणि काऊला भेटायला जाण्याचं. ह्या काही गोष्टीतील चिऊ काऊ नाही तर मित्राच्या जुळया मुली आहेत. त्यांच्या सोबत चांगला वेळही घालवता येईल आणि थोडं साताराही फिरता येईल म्हणून सातारला जाण्याअगोदरच आदित्य फडके यांचं साताऱ्याच्या मुलखात हे पुस्तक वाचण्यात आले होते. पुस्तक वाचुनच साताऱ्याच्या प्रेमात पडलो होतो. पुस्तक अतिशय सुंदर आणि सुटसुटीत आहे. तेच बरोबर घेऊन साताऱ्याला गेलो. तिथे खुद्द लेखकांना भेटणार होतो पण ते राहून गेले.

चला तर आता सफर करुया सज्जनगडासह साताऱ्याची. . .

## किल्ले सज्जनगड

साताऱ्यावरून सज्जनगड हा किल्ला १८ कि. मी. वर आहे. मागच्याच वर्षी गोनीदा दुर्गप्रेमींनी चौथे दुर्गसाहित्य संमेलन सज्जनगडावर ७ ते ९ फेब्रुवारी २०१४ साली आयोजित केले होते. तर जाणून घेऊया अशा या सज्जनगडाविषयी.

शिलाहारांनी याची ११ व्या शतकात उभारणी केली. प्राचीनकाळी अश्वलायन ऋषींची तपोभुमी, त्यामुळे या किल्ल्याचं प्राचीन नाव 'अश्वलायन गड' हे होतं. पायथ्याशी असणाऱ्या परळी गावामुळे याला परळीचा किल्ला हे नाव दिले. बहामनी सत्तेची शकले झाल्यावर विजापुरच्या आदिलशहाकडे हा किल्ला होता. आदिलशहाच्या काळामध्ये याला 'नवरसतारा' हे नाव होत. २ एप्रिल १६७३ या दिवशी शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकला. पुढे ९ जुन १७०० या दिवशी औरंगजेबाने हा किल्ला जिंकुन घेतला. औरंगजेब गेल्यानंतर इ. स. १७०९ मध्ये सज्जनगड शाहु महाराजांच्या ताब्यात होता. अखेर इ. स. १८१८

मध्ये इंग्रजांनी हा किल्ला जिंकला. अशी विविध नावे धारण करणाऱ्या या गडावरील रामदास स्वामींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या लोंकाची संख्या मोठी आहे. सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेल्या परळी गावातील यादवकालीन मंदिरे आवर्जुन पाहावी.

राजवाडा बसस्थानकातून नियमित बस सज्जनगडला जातात. दर एक तासाने बस गडावरती जाते. सज्जनगडाच्या कातळ पायथ्यापर्यन्त गाडी येते. इथून पायऱ्यानी चालत गेल्यावर प्रथम उजव्या बाजुस एक जुने कामधेनू मंदिर आणि समोरच एक हनुमान मंदिर आहे.







गडावरती जाताना लागलेले हे शेंगाचे झाड.

रस्त्याने वरती जाताना मधे मधे स्थापित केलेले ११ हनुमान मुर्ती आहेत. त्या समर्थांनी स्थापित केलेल्या ११ मारुतीची प्रतिकृती आहेत.













शिंगणवाडी खडीचा मारुती


माजगांव मारुती


उंब्रज मारुती


पारगांव मारुती


वहे बोरगांव मारुती


शिराळे मारुती



मनपाडळे मारुती

इथून वरती गेल्यावर प्रथम छत्रपती शिवाजी महाराज महाद्वार लागते.




ह्या उंच आणि रेखीव महाद्वारातून आत गेल्यावर पुढे समर्थ महाद्वार लागते. या दरवाज्यामागे पहारेकऱ्याच्या देवड्या आहेत. दरवाजातून आत आले की उजव्या बाजुला एका काळया पाषाणात छोटासा लेख कोरलेला दिसतो.

गडाच्या कातळपायथ्यापासून जवळजवळ १५० पायऱ्या चढल्यावर गडाचा माथा येतो. समर्थ महाद्वारातून पायऱ्यानी वर आल्यावर एक झाड लागते तिथून एक वाट उजवीकडे जाते. या वाटेने पुढे गेल्यावर एक रामघळ लागते. ही रामघळ समर्थांची एकांतात बसण्याची जागा होती.



आणि माथ्यावर डाव्या बाजुला आल्यावर ‘घोडाळे तळे’ नावाचे तळे आहे. थोडे पुढे गेल्यावर आतमध्ये आणि एक लोकमान्य टिळक स्मृती म्हणून कमान आहे.






सज्जनगडाचा स्थलदर्शक नकाशा.
३ श्री समर्थ समाधी मंदिर
६ श्री समर्थ महाप्रसाद गृह.
७ अशोक वृक्ष वाटिका
९ पेठेतील मारुती मंदिर.
१० श्रीधर कुटी.
११ श्री समर्थ सेवा मंडळ.
१४ घोडाळे तलाव.
१५ श्री अंगाईदेवी मंदिर.
१६ कल्याण छाटी स्मारक.
१७ ब्रह्मपिसा स्मारक.
१८- पांगारे पाणी योजना
२१- गोशाळा.
२२- कल्याण उडी
२३- रामघळ
श्री रामदास स्वामी संस्थान, सज्जनगड.

रस्त्यावर मधेच असे फेटे घेऊन बसलेले एक दुकान आहेत. तो फेटा घालुन ३० रुपयात तुमचा लगेच फोटो दिला जातो. साताऱ्यात आल्याची एक आठवण म्हणून चांगले आहे.



तळयाशेजारी पडक्या अवस्थेतील एक मशिदवजा इमारत आहे तर समोरच आंग्लाई देवीचे मंदिर आहे. या मंदिरातील देवीची स्थापना समर्थानी केलेली आहे. ही देवीची मुर्ती समर्थांना कोरेगाव तालुक्यातील अंगापुर गावाच्या डोहात सापडली. या डोहामध्ये समर्थांना श्रीराम आणि तुळजाभवानी या दोन मुर्ती सापडल्या. यांपैकी श्रीराममुर्ती त्यांनी चाफळमध्ये आणि तुळजाभवानीची मुर्ती सज्जनगडावर स्थापली. तुळजाभवानीची ही मुर्ती काळया पाषाणाची आहे. मंदिरासमोर ध्वजस्तंभाचा बुरुज आहे. आंग्लाई देवी कडून पुन्हा आल्यामार्गे परत यावे. उजव्या बाजुच्या चढणीवर गेल्यावर एक बांधीव तलाव आहे. या तलावाच्या पुढे समर्थशिष्य़ कल्याणस्वामी यांनी समर्थाच्या अंगावरील उडालेल्या छाटीसाठी दरीत मारलेल्या  उडीचे स्मारक, कल्याण छाटीस्मारक आहे. इथून पुन्हा मुख्य वाटेवरून पुढे गेल्यावर डाव्या बाजुला श्रीधर कुटी, आणि त्याच्या समोरच पेठेतील मारुती आहे. पुर्वी या

परिसरात गडावरील मुख्य वस्ती म्हणजे पेठ असावी, म्हणून या ठिकाणी असणाऱ्या हनुमान मंदिराला पेठेतील मारुती म्हणतात. समर्थ गडावर राहण्यासाठी आले त्या अगोदरपासून हे मंदिर आहे. मंदिरातील मारूतीच्या मुर्तीचे वैशिष्ट्य़ म्हणजे या मारुतीचे तोंड उघडे आहे.

या मारूती मंदिराच्या मागच्या बाजुला पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यात येणारे 'सोनेरे तळे' नावाचे तळे आहे. या तळयामध्ये उत्तर बाजुस काही प्राचीन गुंफा आहेत. पण सध्या




पाण्याची पातळी जास्त असल्यामुळे त्या पाण्यातच असतात.



वाटेत अनेक दुकाने थाटलेली दिसतात.





पुढे घेल्यावर अशोकाची झाडे लावलेले अशोकवन आहे. अशोकवनात उजव्या बाजुला समर्थशिष्या अक्काबाई यांचे वृंदावन आहे.







अशोक वनाच्या समोरच गडावरील मुख्य वास्तु म्हणजे श्रीराम मंदिर आणि समर्थ – वृंदावन. या मंदिराची बांधणी संभाजीराजांनी केलेली आहे. श्रीराम मंदिरामधील श्रीराम, लक्ष्मण सीता, हनुमान यांच्या मुर्ती  तंजावरमध्ये अरणीकर नावाच्या अंध- कारागिराकडून बनवून घेऊन, शिवाजीराजांचे बंधु व्यंकोजीराजे यांनी समर्थाना भेट दिलेल्या आहेत. या मुर्तीसमवेत रामदासस्वामींची एक छोटी मुर्ती हनुमानसन्मुख स्थापलेली आढळते. या सर्व मुर्ती पंचधातुच्या असून वर्षातून पाच दिवसच यांची यथासांग स्नान आणि पुजा केली जाते. श्रीराम मंदिराच्या तळघरात समर्थाची समाधी आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत उघड्या शिलेचे दर्शन घेता येते. पुजेनंतर समाधी वस्त्र व फुलांनी आच्छादलेली असते. त्यासाठी भक्तांची गर्दी असते. आम्ही गेलो तेव्हा जास्वंदीची अनेक वेगवेगळया कलरची फुले होती. समाधीमंदिरात दिवे लावण्यासाठी १०८ कोनाडे आहेत. मंदिरात समर्थांच्या जीवनाचा माहितीपट, ठळक घटना, इथे मंदिरात फलकावर लिहलेल्या आहे. दर्शनिय स्थळे व त्यांचा इतिहास इथे लिहलेला आहे.




श्री समर्थांच्या जीवनातील ठळक घटना
१६३० छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवनेरी किल्ल्यावर जन्म
१६३२ तपश्चर्या पूर्ण करून भारत प्रवासाला प्रारंभ.
१६४४ बारा वर्षात हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंत पायी भारत प्रवास पूर्ण
१६४५ महाबळेश्वरला आले, राजकिय, सामाजिक, अध्यात्मिक कार्यास प्रारंभ
१६४५ मसुर येथे मारुती स्थापना व रामनवमी उत्सव सुरु
१६४८ अंगापूरच्या डोहात सापडलेल्या राममूर्तीची चाफळ येथे स्थापना १५७०
१६४९ समर्थ रामदास व संत तुकाराम यांची चिंचवड येथे भेट. १५७१
१६४९ छत्रपती शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांची चाफळ
जवळ सिंघणवाडीला पहिली भेट. १५७१
१६५४ शिवथर घळीत दासबोध ग्रंथ लेखनास प्रारंभ. १५७६
१६५५ श्री व्यंकोजीराजे भोसले यांनी समर्थांकडून अनुग्रह घेतला १५७७
१६५५ श्री समर्थांच्या मातोश्रींचे निर्याण (जांब येथे) १५७७
१६५६ शिवथर घळीजवळच चंद्रराव मोरेला छ.शिवाजी महाराजांनी ठार मारले. १५७८
१६५६ छत्रपती शिवाजी महाराजांनी समर्थांच्या झोळीत राज्य टाकले. १५७८
१६५९ पंढरपूरला पांडुरंगाने रामरूपाने समर्थांना दर्शन दिले. १५८१
१६६३ जेजुरी येथे खंडोबाने रामाच्या रूपाने दर्शन दिले. १५८५
१६७३ छत्रपती शिवाजीराजेंनी परळीचा किल्ला अदिलशहाकडून जिंकून घेतला १५९५
१६७४ छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक. १५९६
१६७६ छ.शिवाजी महाराजांच्या विनंतीवरून समर्थ सज्जनगडावर कायम रहाण्यास आले. १५९८
१६७९ संत वेण्णास्वामींनी किर्तन करता करता समर्थचरणावर देह ठेवला. १६०१
१६८० रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचे महानिर्वाण. १६०२
१६८१ संभाजीराजेंना समर्थांनी सज्जनगडावरुन ऐतीहासिक पत्र लिहीले. १६०३
१६८२ तंजावरहून राम, लक्ष्मण, सीता, हनुमान ह्या मुर्तींचे आगमन. १६०३
१६८२ पूर्व सुचना देऊन सज्जनगडावरच मठात समर्थांनी देह ठेवला. १६०३
१६८२ छत्रपती संभाजी महाराजांनी समर्थांचे समाधी मंदीर बांधले.
१७१४ कल्याण स्वामींचे परांडा येथे मठात महानिर्याण.
(डोमगांव ता.परांडा जि.उस्मानाबाद येथे सिना नदी काठी)
१७२१ आक्कास्वामींनी सज्जनगडावर देह ठेवला.


सज्जनगडावरील दर्शनीय
स्थळे व त्यांचा इतिहास.
•श्री समर्थांचा मठ आणि शेजघर•
•समर्थांचे समाधी मंदीर व राममूर्तीचा इतिहास•
१६८२ साली मठात देह ठेवल्यावर समर्थांच्या देहाला जिथे सध्या समाधी मंदिर आहे
तिथे अग्निसंस्कार करण्यात आला. तिसऱ्या दिवशी सध्या दिसते ती चौकोनी
स्वयंभू समाधी निर्माण झाली. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वयंभू समाधीचे दर्शन
घेतले व रामचंद्रपंत अमात्य यांच्या करवी दोन महिन्यात मोठे दगडी मंदिर बांधले.
खाली भुयारात समर्थांची स्वयंभू समाधी असुन वर श्रीराम मंदिर आहे. ह्या राम-
-मंदीरातील राम, लक्ष्मण, सीता, मारुती या ऐतिहासिक मूर्ती तंजावर येथील अरणीकर
ह्या अंधळ्या कारागिराने तयार केल्या असून ह्या मूर्ती छत्रपती शिवरायांचे सावत्र
बंधू श्री व्यंकोजीराजे भोसले यांनी समर्थांना भेट म्हणून दिल्या. समर्थांनी तीन
दिवस मूर्तींची पूजा केली व मग देह ठेवला. ह्या मूर्ती पंचधातूंच्या असून आतून भरीव
आणि उचलावयास जड आहेत. आषाढ शु॥ १०॥, भाद्रपद अमावस्या, माघ पौर्णिमा,
माघ अमावस्या व फाल्गुन अमावस्या हे वर्षातील फक्त पाच दिवस ह्या मूर्तींना स्नान
घालून सर्व मंदीर स्वच्छ धुतले जाते. समर्थांच्या समाधीला मात्र रोज सकाळी स्नान
व अभिषेक असतो. त्यामुळे रोज सकाळी ७-३० ते ८-४५ पर्यंत उघडी समाधी
पहावयास मिळते. भक्तगण सश्रध्द अंतःकरणाने उघड्या समाधीचे दर्शन घेतात.
•धाब्याचा मारुती•
समर्थांच्या समाधी मंदीराच्या पाठीमागे जी कमान आहे
बाहेर पडून फरसबंदी संपेपर्यंत चालल्यास गडाच्या टोकाला
मंदीर दिसून येते हे मंदीर
असून श्री समर्थांनीच
रक्षणासाठी हा मारुती
स्थापला. एकांतासाठी
छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ ह्या मंदीरात येऊन बसत व
विचार विनीमय करीत. अंगाईदेवी मंदीरातही शिवसमर्थांच्या
गुप्त भेटी होत असत.


सज्जनगडावरील दर्शनीय स्थळे
व त्यांचा इतिहास
पेठेतील मारुती व श्रीधर कुटी
प्रेरणा प्रामुख्याने होती.
सह्याद्रिगिरिचा विभाग विलसे मंदारशृंगापरी ।
ज्या भगवती देव ज्याचे शिरी ।
येथे जागृत रामदास विलसे जो या जना उद्धरी ॥
- कवी अनंत


श्री समर्थ रामदासांनी केलेला
श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरव
निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारु॥
अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी ॥१॥
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी॥
जयाचे गुणवैभवासी। तुलणा कैसी ॥२॥
यशवंत, किर्तीवंत। सामर्थ्यवंत वरदवंत॥
पुण्यवंत आणि जयवंत। जाणता राजा ॥३॥
आचारशील विचारशील। दानशील धर्मशील॥
सर्वज्ञपणे सुशील। सर्वाठायी ॥४॥
धीर उदार सुंदर। शूर क्रियेसी तत्पर॥
सावधपणें नृपवर। तुच्छ केले ॥५॥
सकल तीर्थे मोडिलीं। ब्राम्हणस्थानें भ्रष्ट झाली॥
सकल पृथ्वी आंदोळली। धर्म गेला ॥६॥
देवधर्म गोब्राम्हण। करावयासी संरक्षण॥
हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली ॥७॥
या भूमंडळाचे ठायीं। धर्मरक्षी ऐसा नाही॥
महाराष्ट्र धर्म राहीला कांहीं। तुम्हां कारणें ॥८॥
कितेक दुष्ट संहारिले। कित्येकांसी धाक सुटले॥
कितेकास आश्रय जाहले। शिवकल्याण राजा ॥९॥


श्री रामदास स्वामींचा अखेरचा संदेश
माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकरणी॥
परी मी आहे जगज्जीवनीं। निरंतर ॥१॥
नका करुं खटपट। पहा माझा ग्रंथ नीट॥
तेणें सायुज्याची वाट। गवसेल की ॥२॥
आत्माराम दासबोध। माझें स्वरुप स्वतःसिध्द॥
असता न करावा हो खेद। भक्तजनी ॥३॥
श्री समर्थ रामदास स्वामी

सज्जनगडावर श्रीसमर्थ वास्तव्यास आल्यानंतर शिवरायांनी दोन हजार होन खर्च करून एक मठ बांधून घेतला. श्रीराम मंदिराच्या आवारात उंच जोत्यावर हा समर्थ मठ आहे. शिवकाळात समर्थाचे वास्तव्य इथेच असे. याच मठात त्यांचे देहावसान झाले. या मठात शेजघर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या खोलीत त्यांच्या नित्य वापरातील वस्तु ठेवलेल्या आहेत. यामध्ये शिवाजी महाराजांनी समर्थाना दिलेला पलंग आहे. दिड मीटर उंचीची कुबडी आहे या कुबडीत गुप्ती लपवलेली आहे. पलंगावर रामदासांचे शिष्य व तंजावर मठाधिपती यांनी समर्थाना पाहुन काढलेले चित्र आहे. दत्तात्रयाने दिलेली एक नक्षिदार कुबडी, वेताची काठी, आणि मच्छिंद्रनाथांनी दिलेला सोटा या वस्तु आहेत. याशिवाय समर्थाच्या नित्य वापरातील पानाचा डबा, पिकदाणी, पिण्याच्या पाण्याचा लोटा या वस्तु आहेत. समर्थ रामदासांसाठी कल्याणस्वामी उरमोडी नदीतून पाणी आणत असलेले तांब्याचे हंडे आहेत. मारूतीने प्रसाद म्हणून दिलेले फेट्यासारखे खुमुर्जा वस्त्र, हिमालयातील थंडीच्या निवारणासाठी मारूतीने दिलेली वल्कले देखिल इथे आहेत. अग्निकुंड व प्रताप मारुतीची एक पिवळी मुर्ती अशा समर्थाच्या हस्ते पावन झालेल्या वस्तु आहेत.



श्रीराम मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर एका कोनाड्यात अकरा मारुतीची स्थापना केलेली आहे. जवळच समर्थशिष्या वेण्णाबाई यांचे वृंदावन आहे.

गडाच्या मागच्या बाजुला हे धरण फार सुंदर दिसते.





## समर्थ सृष्टी :-

लग्नात सावधान म्हटले असता पळून गेलेले समर्थ रामदास हे सर्वांनाच शाळेत असल्यापासुनच परिचित आणि कुतुहलही. सज्जनगडावर जाताना मधे समर्थ सृष्टी म्हणून एक फलक, व मोठा मारुती आपले लक्ष वेधून घेतो. आता तिथे बस स्टॉप पण केलेला आहे. समर्थांचे विचार समजुन घेण्यासाठी संपुर्ण समर्थ दर्शन इथे घडवले आहे. समर्थ वाङ:मयाचे अभ्यासक अरुण गोड्बोले यांची ही कल्पना. शिक्षण संस्थाचालक भाई वांगडे, उद्योजक मनीष साबडे यांनी आर्थिक मदत पुरवले व ही संकल्पना तयार झाली. दिड एकर परिसरात हा प्रकल्प उभा आहे. समर्थांचा जीवनपट, कार्य आणि विचारांवर आधारित हे संग्रहालय, थीम पार्क उभे आहे. देवदर्शनाबरोबर समर्थांच्या विचारांचेही दर्शन घडावे, त्यांचे कार्य समजावे म्हणून हा प्रकल्प उभारला आहे.

इथे फार सुंदर पद्धतीने त्यांचा जीवनपट मांडला आहे. बागा, पायवाटा, उपाहारगृह, प्रदर्शने, प्रेक्षागृह, भेटवस्तु दालन, समर्थ स्थापित मारुती दर्शन, इतर मंदिरे, आणि मधोमध ‘ समर्थ दर्शन’ या संग्रहालयाची मांडणी केलेली आहे. सर्व काम जांभ्या दगडात केले आहे. समर्थ दर्शन नावाची गुहा तर फार वेगळी आहे. काळाने भारलेली ही गुहा आहे. तिथे आत गेले की आपल्याला असे वाटते की आपण समर्थांच्याच काळात गेलो आहोत. समर्थांच्या जीवनावरील अशी एकुण पंधरा दालने आहेत. त्यांच्या जन्मापासून ते समाधीपर्यंतचा प्रवास ह्यामध्ये मांडलेला आहे. पहिल्याच दालनात त्यांचे जन्मस्थळ जालना जिल्ह्यातील जांब गाव दखविले आहे. प्रत्येक दालनातील विषय स्वतंत्र पुन्हा आवश्यक ती वातावरण निर्मिती, स्थापत्य, कटआउट्स, पुतळे, ध्वनी हे सर्व वापरून अतिशय छान साकारले आहे. इथेच एका कुटीत समर्थांच्या हस्ताक्षरातील काही पत्रे लावली आहेत. यात समर्थाचे गद्य स्वरुपातील एकमेव पत्र पहायला मिळते. समर्थानी बालवयात टाकळी इथे लिहलेल्या वाल्मीकी रामायणातील काही कागद, त्यात रेखाटलेली काही चित्रे, समर्थांचे, कल्याणस्वामींचे अस्सल चित्र हे सगळे बघून आपल्याला खरे सज्जनगडाची भेट घडते. समर्थ सृष्टी बघून आपल्याला फारच प्रसन्न वाटते. इथे खरे खुरे देवदर्शन झाल्यासारखे वाटते. फक्त पटापट मुर्ती बघून पाया पडून न येता अगदी त्या काळात जाऊन आल्यासारखे वाटते. हे सर्व वाचण्यापेक्षा खरं तर अनुभवण्याचे ठिकाण आहे. समर्थ सृष्टी म्हणजे एखाद्या समर्थ व्यक्तीचा, त्याच्या विचारांचा या पेक्षा मोठा गौरव नाही.

## साताऱ्यातील इतर प्रेक्षणिय स्थळे :-

सातारा हे पुणे, मुंबई, कोल्हापुर ह्या शहरांपासून जवळ आहे. साताऱ्याला प्रामुख्याने ओळखले जाते ते ‘शाहुनगरी’ या नावाने. शाहूराजांची आरंगजेबाच्या ताब्यातून मुक्तता झाल्यानंतर, अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याशी त्यांनी वसाहत निर्माण करायला सुरुवात केली. वास्तविक शांहुचा बराच काळ औरंगजेबाच्या छावणीत, अनुषंगाने मैदानावर गेल्यामुळे त्यांना सपाट जागेवर राहायला आवडे. त्यासाठी त्यांनी साताऱ्यात राजवाडा, अदालतवाडा या वास्तु बांधल्या. साताऱ्याचे सात भाग करून त्याला सात वारांची नावं दिली. काही ठिकाणी तलाव, विहीरीही बांधल्या आणि साताऱ्याची उभारणी सुरू केली. सन १८५३ मध्ये याला नगरपालिकेचे रुप मिळालं.

सातारकर छत्रपतींच्या वास्तव्यामुळे सातारा शहर आणि परिसराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. त्यासंदर्भातील अनेक ऐतिहासिक स्थळे सातारा आणि परिसरामध्ये विखुरलेली आहेत. वाढत्या शहरीकरणामध्येही सातारा आपल पूर्वीच वैभव टिकवून आहे. पर्यटकांसाठी खुप काही राखून आहे. पर्यटकांची साताऱ्यातील खास पाहण्याची ठिकाण म्हणजे जलमंदिर, चार भिंती, अजिंक्यतारा, सज्जनगड अदालतवाडा, खिंडीतील गणपती आणि ऐकीवातील राजवाडा.

१९८५च्या मोजणीनुसार साताऱ्यामध्ये जुनी ९७ मंदिर आणि पाच मोठे तलाव आहेत. यांमध्ये ग्रामदैवत फोडजाई देवी, कृष्णेश्वर मंदिर, विश्वेश्वर मंदिर, ठोल्यागणपती, गारेचा गणपती, कोटेश्वर मंदिर, कासार देवी, फुटके तळॆ, मंगळवार तळे, महादरेतळ, साखर तळ, हत्ती तळ ही ठिकाण आहेत. आम्ही मंगळवार तळे बघितले तळॆ अगदी खोल आहे. त्यातील पाणी बरेच कमी झाले होते. त्याचा वापर आता गणपती, देवी विसर्जनासाठी करतात असे मित्राने संगितले. शिवाय बन्सापूरीमठ, फाशीचा वड, छत्रपती शिवाजी संग्रहालय ही ठिकाणे देखिल मस्त आहेत.

सर्वात प्रथम आम्ही राजवाडा बघण्यासाठी गेलो. राजवाड्याकडे जाताना वाटेत पंचमुखी गणपती बघितला. पंचमुखी म्हणण्यापेक्षा पंचशुंडी गणेशमुर्ती आहे. गजाननच्या उत्पत्तीसंबधित ज्या अनेक कथा प्रचलित आहेत. त्यात मालिनी राक्षसीची देखिल कथा आहे. ‘सुप्रभेदागम’ ग्रंथात ही कथा आली असून त्यात सांगितलेली कथा अगदीच वेगळया प्रकारची आहे.

सोमेश्वर (सोमनाथ) येथील शिवलिंगाचा महिमा असा होता की , त्याच्या नुसत्या दर्शनानेही महापातकीसुद्धा स्वर्गात जाऊ लागले. स्वर्गाकडे इतक्या सहजपणे लोटणारा हा अनाधिकारी माणसांचा लोंढा पाहुन देव चिंतेत पडले आणि त्याला आळा घालण्यासाठी त्यांनी पार्वतीस प्रार्थना केली. तेव्हा तिने उटणे आणि आपल्या अंगाचा मळ एकत्र केला आणि ती गडगासागरतीरावर जाऊन पोहोचली. तेथे मालिनी नावाची एक राक्षसी राहत असे . तिचे तोंड हत्ती सारखे होते पार्वतीने बरोबर आणलेले उटणे व अंगमळ यांचे मिश्रण तेथे टाकताच या मालिनी राक्षसीने ते भक्षण केले. पुढे यथावकाश तिला गर्भ राहुन तिच्या पोटी एक अपत्य जन्माला आले, ते पाच सोंडा असलेले होते. या पंचशुंडी बालकाला शंकरांनी आपला पुत्र माणून पुढे त्याच्या पाच सोंडा एकत्र करून एकच सोंड बनवली. यालाच पुढे गणपतित्व आले. या गणपतीनेच पुढे लोकांना पुण्यकर्मात बाधा उत्पन्न करण्यास सुरवात करून स्वर्गाकडे जाणारा पातक्यांचा अमर्याद लोंढा थोपविला. त्यावरून पुण्यकर्म पार पाडण्यासाठी देखिल या विघ्नेश्वर विनायक गणपतीची पुजा करण्याची, त्याला संतुष्ट करण्याची प्रथा पडली.

राजवाडा बघण्यासाठी जाताना मला वाटले आता मोठा राजवाडा बघायला मिळेल. पण तिथे जाऊन कळाले की हे त्या स्थळाच नाव आहे. तिथे राजवाडा आहे. पण तो बंद आहे. आता त्याच्या घरातील लोक जलमंदिरला राहतात. तेव्हा मला अस वाटत होत की का नाही इथे कोणी राहत किती मोठा वाडा आहे तो. तिथे रहायला काय मजा येईल



राजवाड्यासमोरच प्रतापसिंह गार्डन आहे. गार्डनला नाममात्र एक रूपया फी आहे. गार्डनमध्ये मुलांना खेळण्यासाठी वेगवेगळे खेळ आहेत. बॅटरीवर चालणारी रेल्वे देखिल आहे. लहानांसोबत आम्हीही तिचा आनंद घेतला. राजवाड्यासमोरच मोठी खाऊ गल्ली आहे. वेगवेगळे चायनिजवाले, दाबेली, वडापाव, पानीपुरी, इडली-उत्तपा, चिकन, भेळवाले, फुगेवाले, घोडाफेरी हे कायमस्वरुपी दिसून येतात. पण इथे सुळेगावकर यांचा मिळणारा वडा आणि चटनी, उपवासाची कचोरी अगदी अप्रतिम आहे. त्यांनी गाडीतच किचन बनवले आहे. खास तशी गाडी बनवून घेतली आहे. बाजुला तशीच इडली-उत्तपा यांची गाडी होती. चालते फिरते हॉटेल. पण ते मुळचे तिथलेच. मी काही  फार खवय्यी नाहियॆ. पण खरंच फार वेगळी चव होती ती. चटनी तर अप्रतिम. आणि आकार देखिल मोठा. तोही दहा रुपयातच तुम्ही नक्की ट्राय करा. राजवाडा नावाचे बसस्थानक देखिल आहे. तिथून शहरात जाणाऱ्या बसेस सुटतात

## ठोसेघर :

स्वत:च्या निसर्गसौद्र्याने पर्यटकांना आकर्षित करणार एक सुंदर ठिकाण म्हणजे ठोसेघर धबधबा आणि चाळकेवाडी. सज्जनगडला जाताना मध्ये ठोसेघर धबधब्याला जानारा फाटा दिसतो. तिथून ठोसेघर १० कि. मी. वर आहे. गावापासून पुढे तीन कि. मी. वर ठोसेघर धबधबा आहे. हा धबधबा जितका आकर्षक तितकाच भितीदायक. ठोसेघर हा साताऱ्यात असला तरी लाल माती, घाट रस्ता आणि दाट झाडीमुळे कोकणात आल्यासारखे वाटते. पावसाळयात दरीमध्ये उतरलेल दाट धुक, धबधब्याकडने जाताना आजुबाअजुच्या झाडीतून पक्षांचे येणारे गोड आवाज अगदी मंत्रमुग्ध करणारे अस्तात. सरकारने वाढती गर्दी बघून आता पायऱ्या आणि धबधब्याच्या कातळापर्यत रेलिंगची सोय केली आहे.





## जरंडेश्वर :-

साताऱ्यामध्ये आलं की पुर्व बाजुला एक उंच डोंगर सहजच लक्ष वेधून घेतो. तो म्हणजे जरंडेश्वर. सातारा परिसरामध्ये असणारे हे सर्वात उंच ठिकाण आहे. खर तर ' श्वर' म्हणजे शंकरस्थान, त्याचप्रमाणे जरंडेश्वर शंकर मंदिर आहे. पण मुख्य मंदिर आहे ते हनुमानाचे.

पुराणामध्ये घडलेल्या अनेक कथा आपल्याला माहिती आहेत. त्यांतील रामायणातील युद्धकांडामध्ये इंद्रजिताच्या बाणाने लक्ष्मण जखमी झाला, आणि संजीवनी बुटीसाठी हनुमानाने द्रोणागिरी पर्वत उचलुन आणला, ही गोष्ट तर अगदी बालगोपाळांना सुद्धा माहित आहे. पण द्रोणागिरी पर्वत नेत असताना त्याचा एक छोटासा तुकडा खाली पडला तोच हा जरंडेश्वर. ही गोष्ट मात्र बहुतांशी लोंकाना माहिती नसणारी आहे. या डोंगरावर सर्वत्र आढळणाऱ्या औषधी वनस्पती हीच त्याची साक्ष आहे असं म्हणता येईल.









जरंडेश्वरला येण्यासाठी मुख्य दोन वाटा आहेत. एक जांब गावातून आणि दुसरी पाडळी गावातून. पण जांबगावाकडून येणारी वाट थोडी सोपी आहे. कुठुनही वरती आले की वरती एक पिंपळाचे झाड आणि त्याच्या शेजारी एक चौथरा आहे. या चौथऱ्याच्या बाजुला बाकोबा नावाच्या बोक्याचे एक छोटेसे स्मारक आहे. समोरच गडावरील मुख्य दैवत हनुमान आणि जरंडेश्वराचे मंदिर आहे. हे जरंडेश्वर मंदिर समर्थांनी बांधल्याचे सांगितले जाते. या मंदिराचा सभामंडप १९३० च्या सुमारास दासगिरी महाराजांनी बांधला. या मंडपामध्ये एका दगडी चौथऱ्यावर जरंडेश्वराची स्थापना केलेली आहे.

जरंडेश्वर पाहण्यासाठी साधारणपणे पाऊण ते एक तास वेळ लागतो. सातारा-जरंडेश्वर अंतर १२ कि. मी. आहे. जरंडेश्वरला खाण्याची अथवा पिण्याची सोय नाही.

## समर्थस्थापित अकरा मारूती :-

सातारा जिल्ह्यातील तीन मारूती उंब्रजजवळ आहेत. चार चाफळ गावाजवळ आहेत. बहे-बोरगाव , बत्तीस-शिराळा हे सांगली जिल्ह्यात आहेत. आणि मन-पाडळे, पारगाव हे कोल्हापूर जिल्ह्यात आहेत.

### १) उंब्रज (मठातील मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा सहावा मारूती आहे. रामदासांना इ. स. १६४८ साली ही जागा इनाम म्हणून मिळाली. आणि इ. स. १६४९ मध्ये त्यांनी या ठिकाणी मठ, मारूतीची स्थापना केली. या ठिकाणी चैत्र-पौर्णिमाला उत्सव असतो.

### २) माजगाव ( माजगाव मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा सातवा मारूती आहे. माजगाव गावाच्या वेशीवर असणाऱ्या दगडाला गावकरी गाव-रक्षक मारूती म्हणत. इ. स. १६४९ साली समर्थांनी या पाषाणाची मुर्ती तयार करून घेतली. आणि मुळच्या ठिकाणीच तिची स्थापना केली. या ठिकाणी चैत्र-पौर्णिमाला उत्सव केला जातो.

### ३) चाफळ ( प्रताप मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा चौथा मारूती आहे. चाफळ गावातील राममंदिराच्या मागे प्रतापमारूतीचे मंदिर आहे.

### ४) चाफळ ( दास मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा तिसरा मारूती आहे. चाफळ राममंदिरच्या समोरच दासमारूती आहे. समर्थानी या मारूतीची स्थापना इ. स. १६४८ साली केली.

### ५) मसुर ( सुंदर मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा दुसरा मारूती आहे. मसुरमधील ब्रह्मपुरी भागातील कुलकर्णी घराण्यास समर्थांनी अनुग्रह दिला आणि त्यांच्या घरामध्येच इ. स. १६४५ साली ' महारुद्र मारूती' ची स्थापना केली. या ठिकाणी चैत्र-पौर्णिमाला उत्सव केला जातो.

### ६) शिंगणवाडी ( खडीचा मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा पाचवा मारूती आहे. समर्थांनी स्थापन केलेल्या या अकरा मारूतींमधील हे सर्वात लहान मंदिर आहे. चाफळ गावापासून अवघ्या दीड कि. मी. अंतरावरील टेकडीवर हे मंदिर आहे.

इथून जवळच रामघळ (शिंगणवाडी रामघळ ) आणि कुबडतीर्थ ही ठिकाणे आहेत.

### ७) शहापूर ( वीर मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा पहिला मारूती आहे. शहापूर गावातील नदिच्या तीरावर इ. स. १६४४ साली समर्थांनी या मंदिराची स्थापना केली. या मंदिराबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते की, शहापूर गावामध्ये समर्थ रोज शहापूरकर नावाच्या कुलकर्ण्याकडून भिक्षा आणत. भिक्षा देताना कुलकर्ण्याची पत्नी सतीबाई समर्थांना उलट-सुलट बोलत असे. असेच एके दिवशी समर्थ त्या घरामध्ये गेले असता बाईंच्या पतीला- बाजीपंताना, आदिलशहाने पकडून नेल्याचे समजले. भिक्षा घेऊन झाल्यानंतर समर्थांनी बाईला सांगितले की, आजपासून पाचव्या दिवशी बाजीपंत सुखरुप घरी येतील, आणि समर्थांच्या बोलण्याप्रमाणे पाचव्या दिवशी बाजीपंत सुखरुप घरी परत आले. तेव्हा सतीबाईंना इतके दिवस समर्थांना बोलल्याचा पश्चात्ताप झाला. आणि त्या दांपत्याने समर्थदर्शनाशिवाय अन्न-पाण्याचा त्याग केला. समर्थांना हे अंतर्ज्ञानाने कळाले ते तिसऱ्या दिवशी ते कुलकर्ण्यांच्या घरी आले आणि सतीबाईंच्या विनंतीमुळे त्यांनी या

मारूतीची स्थापना केली. या मुर्तीच्या डोक्यावर गोंड्याची टोपी आहे. त्याचप्रमाणे या मुर्तीचा चेहराही उग्र वाटतो.

### ८) बहे – बोरगाव (विक्राळ मारुती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा आठवा मारूती आहे. हे ठिकाण सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात आहे. या ठिकाणी हनुमान- मंदिराव्यतिरिक्त राममंदिरही आहे. या राममंदिरामध्ये राम, लक्ष्मण, सीता यांच्या मुर्तीसमोर शिवलिंग स्थापन केलेले आहे. समर्थांनी या मुर्तीची स्थापना इ. स. १६५१ साली केली.

### ९) बत्तीस शिराळा (भव्य मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा शेवटचा म्हणजे अकरावा मारूती आहे. समर्थांनी या मुर्तीची स्थापना इ. स. १६५४ साली केली. बत्तीस शिराळे हे गाव नागपंचमीसाठी प्रसिद्ध असल्याने सर्वांना माहीत आहेच. पण याबरोबरच या गावामध्ये काही जुनी देवालयेही आहेत. भव्य मारूती मंदिरही त्यापैकीच एक आहे. अकरा मारूतींमध्ये सर्वात सुंदर असणारे हे मंदिर आहे.

### १०) मन – पाडळे (विशाल मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा नववा मारूती आहे. समर्थांनी या मुर्तीची स्थापना इ. स. १६५१ साली केली. नदीच्या काठावर स्थापन केलेल्या या मंदिराची अलिकडेच दुरुस्ती करून मंदिर प्रशस्त आणि भव्य केलेले आहे. मुर्तीशेजारी दीड फूट उंचीची कुबडी ठेवलेली आहे.

### ११) पारगाव ( गोंडस मारूती) :

समर्थ स्थापनेप्रमाणे हा दहावा मारूती आहे. समर्थांनी या मुर्तीची स्थापना इ. स. १६५२ साली केली. या मुर्त्तीचे वैशिष्ट्य़ म्हणजे हनुमानाच्या केसाची शेंडी बांधलेली आहे.

आणि तो धावत निघालेल्या अवस्थेत आहे. मन- पाडळे आणि पारगाव ही ठिकाणे कोल्हापुर जिल्ह्यात आहेत.

ही सर्व ठिकाणे साताऱ्यातून एका दिवसात पाहुन होऊ शकतात. साताऱ्यातून एकुण अंतर सरासरी ३५० कि. मी. होईल.

## त्रिपुटी :-

सातारा - कोरेगाव रस्त्यावर साताऱ्यापासून अवघ्या ११ कि. मी. अंतरावर त्रिपुटी नावाचे छोटे गाव आहे.

गोपालनाथ महाराजांच्या समाधीस्थानामुळे, हे गाव लोकांना परिचयाचे झाले, पण पर्यटकांच्या द्रुष्टीने अजुनही दुर्लक्षितच आहे. गोपालनाथ महाराज हे एकनाथांच्या परंपरेतील ब्रह्मचारी नाथयोगी.

समाधी मंदिराचे आवार थोडेसे लहान असले तरीही सुंदर आहे. मंदिराच्या मागे बांधीव तलाव आहे. तलावाच्या आणि मंदिराच्या बाजुंनी असणाऱ्या झाडांमुळे इथले वातावरण नेहमी प्रसन्न आणि शांत असते मंदिराच्या बाजुला गोपालनाथ महाराजांचा मठ आहे. मंदिराच्या बाजुला, थोडसे पुढे एक विहीर आहे.

## यवतेश्वर :-

सातारा शहराच्या जवळ वायव्य – पश्चिम दिशेला असणाऱ्या बंड्या डोंगररांगेमधील जागृत शंकराचे देवस्थान म्हणून हे ठिकाण प्रसिद्ध आहे. प्रशस्त अशा आवारामध्ये मुख्य मंदिराव्यतिरिक्त (केदारेश्वर ) आणि काळभैरव यांची मंदिरे आहेत. यवतेश्वरला महाशिवरात्र आणि श्रावणी सोमवार या दिवशी हजारो भाविक दर्शनाला येतात. सातारा- यवतेश्वर अंतर १० कि. मी. आहे. राजवाडा बसस्थानकातून नियमित एस. टी. ची यवतेश्वरला जातात.



## शिवपेटेश्वर :-

सातारा – बामणोली रस्त्यावर, कासच्या अलीकडे ९ कि. मी. वर एका टेकडीवर प्राचीन, अपरिचित शिवपेटेश्वर हे ठिकाण आहे. शिवपेटेश्वर या ठिकाणी सध्या एकच मोठी गुहा शिल्लक आहे. या गुहेमध्ये शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. सातारा- शिवपेटेश्वर अंतर १८ कि. मी. आहे. हे ठिकाण  कास – बामणोली रस्त्यावर असल्यामुळे एस. टी. ची सोय आहे.

## माहुली :-

सातारा – कोरेगाव रस्त्यावर साताऱ्यापासून ५ कि. मी. वर माहुली गाव आहे. महाबळेश्वरी उगम पावलेल्या कृष्णा आणि वेन्ना नद्यांचा संगम माहुली इथे होतो. कृष्णा नदीच्या अलिकडच्या भागाला संगम माहुली, तर नदीपलिकडच्या भागाला क्षेत्र माहुली म्हणतात. संगम स्थान असल्यामुळे इथे बरीच मंदिरे बघायला मिळतात. पेशवाईतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचा जन्म याच माहुली गावातील. ताईसाहेब पंतसचिव यांनी बांधलेले श्रीराधा कृष्ण मंदिर, औंधच्या श्रीपतराव पंतप्रतिनिधींनी बांधलेले श्रीबिल्वेश्वर मंदिर, परशुरामपंत अनगळ यांचे श्रीरामेश्वर मंदिर ही काही महत्त्वाची मंदिरे आहेत. माहुली हे धार्मिक ठिकाण असल्याने सातारकर छत्रपतींचे आणि त्यांच्या कुटंबीयांचे अंत्यसंस्कार इथे केले गेले आणि त्यांचीही स्मारक – वृंदावने येथे उभारली आहेत.





संभाजीराजे यांच्या पत्नी येसुबाई यांची समाधी संगम माहुली इथे आहे. इ. स. १६ जानेवारी १६८१ साली छत्रपती संभाजीराजे यांनी राज्याभिषेक झाल्यानंतर येसुबाईंना

स्वतंत्र राज्यमुद्रा, “श्री सखी राज्ञी जयती” देऊन राज्यकारभारात सामील केले संभाजीराजेच्या नऊ वर्षांच्या कालखंडात त्यांनी स्वराज्याचा राज्यकारभार समर्थपणे केला. जिजाबाईनंतर येसुबाईंनी मराठे शाहीचा मुलकी कारभार योग्यरित्या संभाळला. सातारा इथे त्यांचे सन १७३० साली निधन झाले. छत्रपती शाहुंनी आपल्या मातोश्रीचे वृंदावन संगम माहुली इथे बांधले.

## नेर :-

सातारा - पंढरपुर रस्त्यावर पुसेगावच्या अलिकडे, डाव्या बाजुला, एक रस्ता नेरकडे ज्जतो. या फाट्यपासून तीन कि. मी. वर नेर गावाच्या बाजुला ‘ नेर तलाव’ आहे. इ. स. १८७३ च्या सुमारास व्हीक्टोरिया या राणीच्या काळात तिने हा तलाव बांधला. तलाव भरल्यावर त्यावरून पाणी वाहुन जाते. त्या वेळी बांधावरून पडणारे पाणी एखाद्या मोठ्या धबधब्यासारखे दिसते. शिवाय तलावामध्ये एका छोट्याश्या टेकडीवर चैतोबाचे मंदिर आहे. चैतोबा म्हणजे तुकाराम महाराजांचे गुरु असल्याचे सांगितले जाते. चैतोबाच्या मंदिराकडे जाणारी वाटही जितकी सुंदर आहे तितकीच धोकादायक. भोवती प्रचंड भरलेला जलाशय आणि मधूनच जाणारी छोटीशी पायवाट यांचा आनंद त्या ठिकाणी जाऊनच घेतला पाहिजे. सातारा – नेर अंतर २३ कि. मी. आहे. ह्या ठिकाणी खाण्या – पिण्याची काही सोय नाही.



## पुसेगाव :-

सातारा – पंढरपुर रस्ता म्हणजे, अनेक साधु- संतांनी पावन केलेला एक वेगळाच मार्ग आहे असे म्हणावे लागेल. कारण या रस्त्यावर अनेक लहान – मोठी धार्मिक ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. कोरेगावपासून १३ कि. मी. असणारे पुसेगाव येरळा नदीच्या तीरावर वसलेले आहे. साधारणपणे पाचशे ते सहाशे वर्षापुर्वी इथे एक मोठे अरण्य होते. या अरण्यात नदीच्या तीरावर नाथपंथीयाच्या अकरा लिंगापैकी सिद्धनाथ नावाचे एक लिंग होते. काही वर्षानंतर बारामती तालुक्यातील परिंचे गावचे जाधवराव याचा शोध घेत त्या ठिकाणी आले, आणि त्यांनी वसाहत निर्माण करायला सुरुवात केली. त्यांच्यापुर्वी इथे एक धनगर कुटुंब राहत होते. पण, सेवागिरी महाराजांच्या वास्तव्यामुळे व समाधीस्थानामुळेच या ठिकाणाला तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झाले. त्यांनी प्रवचनाद्वारे या भागामध्ये लोकशिक्षण दिले. काही काळ

लोकांनी त्यांना त्रासही दिला. परंतु त्यांनी केलेल्या अनेक चांगल्या गोष्टीमुळे त्यांचे कीर्ती वाढली. सेवागिरी महाराजांनी या भागात मठ, विहीर, दत्ताचे मंदिर बांधले. आणि त्याच्याच खाली १० जानेवारी १९४७ साली ते समाधिस्त झाले. त्या दिवशी म्हणजे मार्गशीर्ष वद्य चतुर्दशीला यानिमित्त एक मोठी जत्रा या गावात भरते. आणि त्यापुढे दहा दिवस चालते. यात्रेकरीता दोन महिने अगोदर नियोजन चालु होते. या वेळी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. भक्तजनांनी अर्पण केलेल्या नोटांची रक्कम ३०-३५ लाखांच्या घरात जाते. जी चोखपणे मोजली जाते. व तिचा उपयोग समाज उपयोगी कामासाठी केला जातो. सुरवातीला बैलगाडीतून महाराजांची रथयात्रा केली जात असे. १९५० साली सेवागिरी महाराजांनंतर पहिला मठाधिपती नारायणगिरी महाराज यांनी सागवानी लाकडाचा अतिशय देखणा रथ तयार करून घेतला. १९९४ मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करून त्यांना नविन रुप दिले आहे. याच वेळी पाच मजली भक्त निवासाची इमारतही बांधली गेली आहे. ट्रस्टतर्फे भक्तगणांसाठी मोफत वाचण्यासाठी धार्मिक ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. रथोत्सवयात्रेमध्ये लाखो भाविक येतात. प्रसाद म्हणून दोन लाख रुपयांचे लाडु वाटप केले जातात. प्रत्येक अमावस्येला व गुरुवारी महाप्रसाद वाटप केले जाते. पुसेगाव ते पंढरपुर अशी आषाढीच्या यात्रेसाठी दिंडी निघते. यात वारकऱ्यांची जेवण्याची विनामुल्य सोय केली जाते.

सातारा – पुसेगाव अंतर २३ कि. मी. आहे.

## गोंदवले :-

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जे विख्यात महाराष्ट्रीय संत होऊन गेले त्यांच्यापैकीं श्रीब्रह्मचैतन्य तथा गोंदवलेकर महाराज हे एक होत. त्यांचा जन्म माघ शुद्ध द्वादशी शके १७६६ (इ. स. १८४५) या दिवशी गोंदवले बुद्रुक या गांवी झाला.

माण तालुक्यामध्ये माणगंगा नदीच्या काठावर गोंदवले गाव वसलेले आहे. गोंदवलेकर महाराजांच्या वास्तव्याने आणि समधिमुळे या ठिकाणाला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले. त्यांचे घराण्यांत विठ्ठलभक्ति व पंढरीची वारी असून पूर्वज सदाचार संपन्न व व लौकिकवान होते. ते घरी थोडी शेती करून कुलकर्णीपणाचें काम करीत. श्रीमहाराजांचे मूळ नांव गणेश रावजी घुगरदरे. स्मरणशक्ति, चलाख बुद्धि, एकांतप्रियता, रामनामाची आवड ह्या गोष्टी श्रीमहाराजांमध्यें लहानपणापासूनच होत्या. त्यांच्या जीवनामध्ये त्यांनी अनेक ठिकाणी राममंदिरांची स्थापना केली. त्याचबरोबर लोकांना नामजपाचा आणि अन्नदानाचा महिमा सांगितला. आणि १९१३ साली ते या ठिकाणी समाधिस्थ झाले. या मंदिराची उभारणी १९३६-३७ साली झाली, आणि भाविक या ठिकाणी नित्य दर्शनासाठी येऊ लागले. प्रचंड असणाऱ्या मंदिराच्या आवारामध्ये भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे संस्थानाने भक्त – निवासाच्या तीन – चार इमारती उभारल्या आहेत. फक्त अंथरूण- पांघरुणाची सोय आपण करावी. दुपारी आणि रात्री दिल्या जाणाऱ्या महाप्रसादासाठी एक मोठा मंडप बांधला आहे. दुपारी प्रसाद दीड वाजता बंद होतो.

गोंदवले गावामध्ये, गोंदवलेकर महाराजांच्या मंदिराबरोबरच थोरले राममंदिर, धाकटे राममंदिर, शनीमंदिर, दत्तमंदिरसुद्धा पाहण्यासारखे आहे . सातारा- गोंदवले अंतर ७१ कि. मी. आहे. गोंदवलेकर महाराज मंदिरामध्ये भक्त – निवास आणि प्रसादाची सोय आहे.

### शिष्यपरिवार

श्रीब्रह्मचैतन्य महाराजांचा शिष्यपरिवार सर्वदुर पसरलेला आहे. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे –

श्री ब्रह्मानंद

श्री आनंदसागर


श्री महाभागवत

श्री भाऊसाहेब केतकर

पु. तात्यासाहेब केतकर

प्रा. क. वि. बेलसरे





## कास पठार आणि कास तलाव :

कास पठार २०१२ साली एकदम प्रसिद्धीत आले ते जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नाव सामावल्यामुळे. जुलै ते सप्टेंबर या कालावधीत इथे फार वेगळया वनस्पती फुलतात. सर्व पठार रंगीबेरंगी होऊन जाते. तब्बल १४५२ प्रकारच्या वेगवेगळया वनस्पतींच्या प्रजाती इथे फुलतात. ते बघणे म्हणजे खर तर एक सोहळा असतो. निसर्गाच्या चमत्काराची अनुभुती इथे पहायला मिळते. कास पठाराचे सर्वात महत्वाचे म्हणजे इथे फुलणाऱ्या दुर्मिळ वनस्पती आणि त्याची साक्ष देणारे हे दुर्मिळ स्थळ. यातील काही तृण, काही वेली, तर काही छोटीशी झुडपे. काही वनस्पती या फार जुन्या पण आहेत.







' वायुतुरा ' ही वनस्पती केवळ याच पठारावर आढळते. हिला मधोमध 'वाय' आकाराचा एक तुरा फुलतो. गेल्या काही वर्षात दिसणारी वनस्पती मात्र आता अभावानेच दिसायला लागली आहे. पच्छिम घाटातील ३९ स्थळांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाला. पण महाराष्ट्रापुरते बोलायचे तर फक्त चार स्थळांचा यात समावेश झाला. त्यापैकी एक कास पठार, चांदोली, कोयना, राधानगरी ही चार स्थळे. पच्छिम घाट बोलायचे

म्हणजे गुजरातमधील तापी नदीपासून जवळजवळ कन्याकुमारीपर्यंतचा हा प्रदेश. जागतिक वारसा स्थळांच्या संरक्षण संवर्धनाबाबत युनेस्को महत्वाची भुमिका बजावते. पच्छिम घाटाचा समावेश जागतिक वारसा यादीत समावेश झाला म्हणजे आपला विजयच आहे. पण त्याबरोबर आपली जबाबदारी न संपता उलट ती वाढली आहे. उलट शासन, स्वंयसेवी संस्था, स्थानिक लोक, पर्यटक, नेचरलव्हर, आणि सर्व लोकांनी जबाबदारी घेतली पाहिजे ती त्याच्या संवर्धनाची. वाढते पर्यटन, पवनचक्क्या वाढ्ती बांधकामे, आणि अभ्यासकांमुळे पठाराला धोका निर्माण झाला आहे. जर अश्या ह्या स्थळाला कुठला गंभीर धोका निर्माण झाला, वारसा स्थळ म्हणून त्याची काळजी घेतली गेली नाही तर असे स्थळ त्या यादीतून वगळण्याचा धोका देखिल असतो. हे काही एकदम करत नाही. आधी ते धोकादायक यादीत टाकुन, संधी देऊनच पुढचे पाऊल टाकले जाते. ह्यापुर्वी ओमान आणि जर्मनीबाबत असे झाले आहे म्हणून तुम्हाला सांगत आहे. अशा प्रकारे त्या यादीतून वगळले जाणे ही किती लाजिरवाणी आणि अपमानास्पद बाब आहे. त्याअर्थी युनेस्कोचा निधी बंद होणे असाही अर्थ असतो. काहितरी करायला हवे याचेही.

साताऱ्याहुन यवतेश्वराच्या रस्त्याला लागल्यावर एका डोंगराच्या धारेवरून पुढे हा रस्ता कास तलावाकडे जातो. इथे जाताना आजुबाजुला एक विशिष्ट्य प्रकाराचे डोंगर दिसतात. त्यांचे माथे तासून काढल्यासारखे सरळसोट आहेत.

कास तलाव बराचसा महाबळेश्वरच्या वेण्णा तलावासारखा आहे. रस्ता तलावाला वळसा घालुन कास गावाकडे येतो. कास गावाबाहेर कासाई देवीचे मंदिर आहे. व काठावरच हिरव्या रंगाचे गेस्ट हाउस अतिशय सुरेख दिसते.

थंड हवा, घनदाट झाडी, लाल माती या सर्व गोष्टी छान वाटतात.


## औंध :-

माण देशातील श्री यमाई देवीचे जाग्रुत देवीस्थान म्हणून एक सुंदर शहरवजा गाव म्हणजे औंध प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर औंधमध्ये असणाऱ्या चित्रसंग्रहालय व ग्रंथालयामुळे देशविदेशच्या पर्यटकांच्या हे जास्त परिचयाच झालेल आहे.

औंध साताऱ्यापासून अवघ्या ४३ कि. मी. वर आहे. औंधला जवळ असणारे दुसरे छोटे शहर म्हणजे रहिमतपूर. हे शहरदेखिल रेल्वेने जोडलेले आहे. ऐतिहासिक शहर रहिमतपूर आणि तिथली १७ व्या शतकातील रणदुल्लाखानची कबर आणि इस्लामी वास्तु पाहुन पुढे औंधला जाता येते. या गावाच्या नावाबद्दल एक आख्यायिका सांगतात की औंधासुर नावाचा एक राक्षस या ठिकाणी राहत होता. यमाई देवाने त्याचा वध केला. त्याच्या नावावरूनच या गावाला औंध हे नाव पडले. त्या ठिकाणी औंध गावामध्ये आणि गावाजवळच्या टेकडीवर यमाई देवीची दोन मंदिर आहेत. टेकडीवर असणार देवीच मुळ मंदिर तटबंदिमध्ये उभारलेल असून दुरून हे अगदी जेजुरीच्या मंदिराची आठवण करून देत. औंध गावातून टेकडीवर, मंदिरात जाण्यासाठी साधारणपणे ४७५ पायऱ्या आहेत. पण पर्यटकांच्या आणि भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे आता मंदिरापर्यंत डांबरी रस्त्याची सोय करण्यात आली आहे. मंदिरातून पायर्यांनी किंवा रस्त्याने परतीच्या मार्गावर लक्ष वेधून घेतो तो **भवानी संग्रहालयाचा** फलक. या संग्रहालयाची स्थापना सन १९३८ मध्ये भवानराव श्रीनिवासराव तथा बाळासाहेब पंडित प्रतिनिधी यांनी केली. त्यांनी जमवलेल्या अनेक दुर्मिळ गोष्टी इथे प्रदर्शानात ठेवल्या आहेत. श्री भवानी चित्रसंग्राहलय व ग्रंथालयाचा विस्तार एकुण अठरा प्रशस्त कला विभागांचा असुन, त्याखाली आणि वर अशा दोन विभागात आहे. तेथे सहा वेगळे शिल्प बघायला मिळाले. ते शिल्प म्हणजे वर्षा, ग्रीष्म, वसंत, हेमंत, शिशिर आणि शरद ह्या सहा प्रमुख ऋतूंना स्त्रीरुपात कल्पना करून ते एकेकाचे शिल्प बनविले आहे. हे तर आपल्या कल्पनेच्याही पलिकडे आहे. संग्रहालयाच्या मध्यभागी एक फार मोठा बुद्धिबळाचा पट आहे. पण या पटावर सोंगट्या आहेत त्या फार वेगळ्या आहेत. ते म्हणजे युद्धासाठी सज्ज असलेले वेगवेगळ्या वेषातील सैनिक. आहे की नाही काहितरी वेगळे. अजिंठा येथिल चित्राच्या बहुमोल प्रतिकृती देखिल इथे बघायला

मिळतात. हस्तिदंतात कोरलेल्या वस्तुंचा एक विभाग इथे स्वतंत्र आहे. हस्तिदंतामध्ये छोटी व्यक्तीशिल्पे देखिल आहेत. श्रीमंत भवानराव व इतर व्यक्तींची शिल्प आहेत ती. आतापर्यंत फक्त वस्तु बघितल्या होत्या पण अशा हस्तिदंतात व्यक्तींची शिल्पे बघितली नव्हती. अजुन एक वेगळे म्हणजे चंदनाच्या लाकडात कोरलेली श्रीदेवी यमाई आणि दुसरे म्हणजे शिवाजी महाराजांचे चंदनात कोरलेले ' शिवचरित्र ' अगदी अप्रतिम. ह्या संग्राहलयाच्या नावात ग्रंथालयचा उल्लेख येतो कारण इथे फार मोठे ग्रंथालय आहे. आज शेकडो दुर्मिळ पुस्तके अभ्यासकांसाठी इथे उपलब्ध आहेत. इथे आम्हाला बघण्यासाठी वेळ मिळाला नाही. पण हरकत नाही त्यामुळे तर परत येऊ आम्ही. ह्या संग्रहालयात बरेच काही बघण्यासारखे, समजुन घेण्यासारखे आहे. ते बघायला जाताना अगदी वेळ काढुन गेले पाहिजे तरच त्याच्यात मजा आहे . आता हे संग्रहालय महाराष्ट्राच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालयाच्या ताब्यात आहे. भवानी संग्रहालयाची वेळ सकाळी १० ते ५. ३० पर्यंत आहे. या ठिकाणी चहा- भजीची सोय होऊ शकते, पण मुक्कामाची मात्र सोय नाही. औंध गावापासून ९-१० कि. मी. वर सिद्धेश्वर – कुरोली गावामधील **सिद्धेश्वराचे प्राचीन** मंदिरही पाहण्यासारखे आहे. शिवाय गोंदवलेकर महाराजांच्या प्रेरणेने गावामध्ये १९११ साली बांधलेले राममंदिरही पाहण्यासारखे आहे.

## ब्रम्हेंद्रस्वामींचे धावडशी :





शाहु छत्रपती, पेशवे, कान्होजी आंग्रे यांचे गुरु असलेले ब्रम्हेंद्रस्वामी एक विलक्षण व्यक्तिमत्व होते. साताऱ्यापासून २५ कि. मी. असलेल्या धावडशी गावी ते कोकणातून येऊन स्थायिक झाले. परशुरामाचे निस्सिम भक्त असलेल्या या स्वामींनी धावडशीला भार्गवराव मंदिर बांधले. त्यांचे प्रस्थ एवढे होते की जंजिरेच्या सिद्दीच्या सरदाराकडून चिपळुणच्या परशुराम क्षेत्राची नासधुस झाली तर त्यांनी सिद्दीकडूनच नुकसान भरपाई म्हणून ते देऊळ परत बांधून घेतले. धावडीशीचे भार्गवराव मंदिर मोठे पहाण्यासारखे आहे.

पाण्याचे तीन मोठे हौद बांधून जनावरे आणि माणसांसाठी स्वतंत्र सोय केली आहे. मंदिरावरील मुर्तिकाम पण पहाण्यासारखे आहे. झाशीची राणी लश्मीबाई हिचे माहेरचे गाव म्हणजे हेच धावडशी असे म्हटले जाते. पण मी मागे वाचले होते की जळगावला त्यांचे माहेरचे गाव आहे. . शोधुया नक्की काय ते.


सातारा- धावडशी- मेरुलिंग-लिंब-गोवे-सातारा हा एक दिवसाचा प्रवासमार्ग करता येईल. लिंब गावी बासुंदी फार रुचकर मिळते.

## शिखर – शिंगणापूर :-

हे सातारा जिल्ह्यातील शिखर शिंगणापूर आणि पुणे जिल्ह्यात आहे ते शनी शिंगणापूर . सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यामध्ये दहिवडी गावापासून २० कि. मी. अंतरावर शिखर शिंगणापूर वसले आहे.


पायथ्याशी शिंगणापूर गाव आहे. मंदिरात जायला पायऱ्या आहेत पण आता वरपर्यंत गाडी रस्ता तयार केला आहे. पायऱ्या चढून जाताना मध्ये खडकेश्वर मंदिर आहे. मंदिरा रामध्ये मोठ्या घंटा आहेत. एक घंटा ब्रिटीशांकडून मिळाली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये दोन शिवलिंग आहेत. त्यांनाच शिव पार्वतीचे प्रतिक मानतात. महादेवाचे हे मंदिर आणि शिंगणापुर गाव यादव कुळातील सिंधण राजाने वसविले आहे असे म्हणतात. मंदिराला उंच मजबुत दगडी तटबंदी आहे. लांबवर दिसणारा हाच तो तलाव. व समोर पाच मोठे नंदी बाजुबाजुलाच आहेत. असे मी पहिल्यांदच पाहिले.

भोसले घराण्यामध्ये शिखर शिंगणापुरचे अतिशय महत्व होते. मालोजीराजे भोसले आपल्या परिवारासह इथे येत असत. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी भोसले यांनी येथिल भाविकांचे पाण्याचे हाल बघून हा तलाव बांधला. त्याला पुष्करतिर्थ असे म्हणतात. पुर्वीचे देऊळ पडल्यावर शाहु महाराजांनी १७३५ मध्ये सध्याचे देऊळ बांधले. १९७८ मध्ये त्याचा जिर्णोद्धार झाला. शिखराची व मंदिराची डागडुजी करून आकर्षक रंग दिला. शंभु माझा नवसाचा हा मराठी चित्रपट याच स्थानावर चित्रित आहे. सातारा, सोलापुर, आणि पुणे या जिल्ह्यांच्या सिमेवर असल्याने येथे भाविकांची वर्दळ नेहमी दिसते.





मंदीरासमोरील मोठी दिपमाळ





तटबंदी आणि समोर दिसणारा तलाव.

शिखर – शिंगणापूर येथून खालचा दिसणारा रस्ता



मंदीरासमोर थोड्या अंतरावर समोर संभाजीराजे, शिवाजीराजे, आणि शहाजीराजे यांची समाधी प्रतिके आहेत. बांधकाम अतिशय मजबुत आहे. पण तिथे प्रेमीयुगलांनी आपली नावे कोरून अक्षरशः भिंती घाण केल्या आहेत. ते पाहून तळपायाची आग मस्तकात गेली.








## मागचे दिसणारे डोंगररांग आणि तिथे असलेले एकमेव झाड.



**नकाशा :-** दुर्ग पुस्तक - सतिश अक्कलकोट



एकट्या साताऱ्यात २७ एक किल्ले आहेत. त्यांची सैर आपण नंतर करुयाच. खास साताऱ्याचा आपला अजिंक्यतारा बघायचा राहिला आहे. आणि छोटी मोठी (छोटी मोठी असं म्हणणं चुकीचं आहे ना? कारण महाराजांचा पदस्पर्श झालेलं प्रत्येकच ठिकाण हे तिर्थक्षेत्रच आहे) बरीच ठिकाणे आहेत. साताऱ्यातील वनकुसवडे पठारावर महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट या शासनाच्या वतीने पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रकल्प मानला जातो. वनकुसवडेसह, ठोसेघर, चाळकेवाडी, माळेवाडी येथे पवनचक्क्या उभारण्यात आल्या आहेत.



# ई साहित्य प्रतिष्ठान



मित्रहो

मी माधुरी अरविंद नाईक.

ई साहित्य प्रतिष्ठानचा दुर्ग भ्रमण व प्रवासवर्णनांचा विभाग मी सांभाळते.

मला आज तुमच्याशी थोड बोलायच आहे. तुम्ही माझे सातारा- सज्जनगड पुस्तक तुम्ही वाचले आहे. यापुर्वी तुम्ही मी लिहीलेली मालवण – सिंधुदुर्ग, तसेच खांदेरी उंदेरी, माहुलीगड ही पुस्तकंही वाचली असतीलच. त्यामध्ये मी किल्ल्यासोबत थो्डी आजुबाजुची फिरण्याची ठिकाणे देखिल दिली आहेत. या पुस्तकांचा उद्देश म्हणजे जर कोणी तसे नियोजन करत असेल तर त्याला मदत व्हावी असा माझा हेतु आहे. पण त्यात पण शेवटी बरीच ठिकाणे राहुन जातात. तर आता ती मदत तुम्ही मला करावी अशी मी अपेक्षा करत आहे. आज प्रत्येकजण कुठे ना कुठे फिरत असतोच. आणि हातात तर मोबाईल असतोच त्यामुळे फोटो काढणे हे आलेच. तर तेथिलच फोटो तुम्ही आम्हाला पाठवा. ते अगदी प्रोफ़ेशनल हवेतच असे काही नको. पण तेथिल सद्यस्थिती तर आपल्याला कळेल. ठिकाणे म्हणजे काही शिमला, मनाली, जम्मु काश्मिर , लेह लडाख नको. तर अगदी साधी साधी ठीकाणे आम्हाला लिहुन पाठवा. कोणी कुठे नाही गेले तरी आपल्या गावी तर सगळेच जातात.

प्रत्येक गावामध्ये एक सुंदर मंदिर असते. त्याची वर्षातुन एकदा यात्रा असते. पालखी निघते. उत्सव साजरा केला जातो. काहीतरी गावात प्रथा असते. त्याची माहिती आम्हाला कळवा. हे वाचायला मला फार मजा येईल. आणि अशा आवडीचा देखिल एक वर्ग असेलच त्यालाही मदत होईल. ते तुम्ही आम्हाला नक्की कळवा. आपण सर्व मिळुन त्याचा एक ग्रंथ बनवुया.

आता बघा मी मालवण म्हणजे सिंधुदुर्ग किल्याविषयी लिहले आहे. पण मला पुर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्याविषयी माहिती हवी आहे. ते एकटी तर मी करु शकत नाही. त्यासाठीच मला तुमची मदत हवी आहे. हे पुस्तक जरी पब्लिश झाले असले तरी. अजुन माहिती जमा झाल्यास ती आपण आपल्या वेबसाईटवर कायमस्वरुपी ठेवु शकतो. हे झाले एकट्या सिंधुदुर्गविषयी तेच आपल्याला सर्व जिल्ह्याविषयी करायचे आहे. आता सातार्‍यातील पण बर्‍याच स्थळांची मी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. पण फिरण्यासारखे अजुन बरेच काही आहे. ते तुम्ही आम्हाला कळवा.

आमच्या ग्रुपमध्ये विशाल दळवी, भास्कर नारकर, पंकज घारे, स्वप्नील कारळे, नचिकेत जोशी, संकल्प चौधरी असे अनेकजण आपआपली ट्रेक्स करून झाले की लगेच त्याबद्दलची माहिती कळवतात व त्यांचे पुस्तक बनत जाते. महाराष्ट्रातल्या अशा किल्ल्यांबद्दलच्या पुस्तकांचे अर्धशतक आम्ही लवकरच पूर्ण करू. या अभियानात तुमची फ़ार फ़ार गरज आहे. तुम्ही लेखक व्हा. छायाचित्रकार व्हा.

फार काही लिहण्याची गरज नाही. जसे की बघा माझे माहेरचे गाव नांदुर आहे. ते पुणे -नाशिक महामार्गापासुन ३ कि.मी. आत आहे.

१. तिथे रामाचे सुंदर मंदिर आहे. तिथे रामनवमीला मोठी यात्रा असते.यात्रा दोन दिवस असते. पहिल्यादिवशी रामजन्म साजरा केला जातो. संपुर्ण गावात जेवण असते. ज्या स्रियांना लवकर मुल होत नसेल त्या मोठ्या श्रद्धेने रामाच्या पाळण्याची दोरी धरतात.

२. दुसऱ्या दिवशी बैलगाड्यांची शर्यत असते. ज्याने कोणी आतापर्यत अशी शर्यत बघितली नसेल त्याच्यासाठी झाला हा नविन पॉइंट.

३. माझ्या गावात गहु, बाजरी, काकडी, गाजर, बटाटे,टॉमॅटो मका, वांगी, तुर, हरभरा,ही पिके होतात.

४. गावात एक डोंगरावर खंडोबाचे आणि शनीचे मंदिर आहे. खंडोबाच्या डोंगरावर दर रविवारी आणि पौर्णिमेला गावकरी खंडोबाची तळी भरतात.

५. गावात एक तळे आहे. तिथे पावसात फार छान वाट्ते. बाजुला सर्व हिरवेगार होते. बाजुला एक छोटे मंदिर आहे. कशाचे ते माहित नाही. पण आता मी नक्की शोध घेईल. मंदिर आहे हे कळाले ना बस तर झाले आपले काम.

जेव्हा केव्हा पुण्याचे पुस्तक बनेल तेव्हा ही माहिती मला उपयोगी नक्की पडेल.

## बदलापुर - कोंडेश्वर धबधबा आणि तिथे जाताना दिसणारा निसर्ग :-



**घाटकोपर – खंडोबा मंदिर :-**

घाटकोपरला डोंगरावरती खंडोबाचे मोठे मंदिर आहे. दर रविवारी तिथे भरपुर लोक जातात. तिथे जाणारा रस्ता थोडा खराब असला तरी. वरती गेल्यावर फार छान वाटते. वरुन बरीच मुंबई बघता येते. तसेच विमानतळावर उतरणारी- उडणारी विमाने पण येथुन दिसतात.

**सायन :-** सायन म्हणजे शिव येथे ३५ एकरावर महाराष्ट्र नेचर पार्क आहे. इथे फुलपाखरु उद्यान देखिल विकसित केले आहे. धारावी बस डेपो समोर हे पार्क आहे. पार्कला नाममात्र ५ रुपये प्रवेश फी आहे. हे किती जणांना माहित आहे. हा आता जे तिथे कामानिम्मित जात असतील त्यांना महित असेल.

बस, असेच काही तुम्हाला लिहुन पाठवायचे आहे, आणि जमल्यास एखादा फोटो. एवढे तर नक्कीच करु शकता ना? त्या सर्व माहितीचे व्यवस्थित संकलन करण्याचे काम माझे.

माधुरी अरविंद नाईक.

Madhuri.jadhav26@yahoo.co.in

esahity@gmail.com

श्री लक्ष्मी पार्क फेज -२
बिल्डिंग नंबर-५,
रुम नं -६०४, लोकमान्यनगर, ठाणे- पश्चिम- ४००६०६
mo. no.-9820234891